पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक ५

# सभावृत्तांत

दिनांक - ०२/०८/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०२/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा.प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.झुरे – सह आयुक्त, मा.टेकाळे – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे – कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्रमांक ९) औंध रावेत रस्त्यावर “Y” Junction येथे अंडरपास बांधणे.

विषय क्रमांक १०) पिंपरी चिंचवड मनपा २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पाणीपुरवठयाचे कामाबाबत – मा.किरण मोटे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक १९/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

ठराव क्रमांक :२७ विषय क्रमांक : १
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३,
दि.२१/०६/२०१३

विषय - डॉ.के. अनिल रॉय,वैद्यकीय अधिकारी यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :२८ विषय क्रमांक : २
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – पर्यावरण
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.पअक/१०/कावि/६२५/२०१३,दि. ८/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मिलिटरी डेअरी फार्मचे नदीतील पंपींग करुन मिळणारे पाणी बंद झाल्याने व त्यांची दैनंदिन पाण्याची गरज लक्षात घेता व कामाची निकड पाहता सद्यस्थितीत या विभागाकडे चालू असलेल्या चिंचवड, भाटनगर येथील मैलाशुध्दीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामधून (निविदा क्र. ७/२-२०१०-११) सदर मिलीटरी डेअरी फार्म येथील काम करुन घेणेस ( कामाच्या होणा-या स्थळ बदलाबाबत ) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :२९ विषय क्रमांक : ३
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – बीआरटीएस स्थापत्य
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/काअ/५००/२०१३,दि.२/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना पानांक २९ अ.क्र.१०३ देहू आळंदी रस्ता साखळी क्र. ८/२५० कि.मी. ते १५/२५० कि.मी. ३० मी. डी.पी. प्रमाणे उर्वरित कामे करणे या कामासाठी र.रु.१० कोटी तरतूद केली असल्याने त्या तरतूदीमधून सदर कामासाठी र.रु.९,६३,८०,०००/- ( अक्षरी र.रु.नऊ कोटी त्रेसष्ट लाख ऐंशी हजार फक्त ) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :३०　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक : ४
दिनांक : २/०८/२०१३　　　　　　　　　　　　　　विभाग – वैद्यकीय
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर　　　　　　　　　　　अनुमोदक : मा.साधना जाधव
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.वैद्य/८/कावि/६८१/२०१३,दि.१२/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मौजे दापोडी येथील आरक्षण क्र.३/४ मुस्लिम दफनभूमीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३२२ नुसार दफनविधी करणेस परवानगी देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे  पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :३१　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक : ५
दिनांक : २/०८/२०१३　　　　　　　　　　　　　　विभाग – प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे　　　　　　　　　　　अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४०/२०१३,  दि.१६/०६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

डॉ. उदय टेकाळे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे  पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :३२　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक : ६
दिनांक : २/०८/२०१३　　　　　　　　　　　　　　विभाग – प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव　　　　　　　　　　　अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री.सतिश कुलकर्णी, मुख्याधिकारी गट अ यांचे सहाय्यक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३३ विषय क्रमांक : ७
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री.ज्ञानेश्वर ढेरे , मुख्याधिकारी श्रेणी १ यांचे सहाय्यक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३४ विषय क्रमांक : ८
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – स्थापत्य प्रकल्प
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था प्रकल्प/जा/कावि/५२१/२०१३, दि.१९/७/२०१३

विषय - मुबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी चौक कर्बस्टोन, फुटपाथ रस्ता, दुभाजक इ. देखभाल दुरुस्ती करणे या उपलेखाशिर्षाखाली दापोडी ते निगडी मार्गदर्शक फलक बसविणे व दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : ३५ विषय क्रमांक : ९
दिनांक : २/०८/२०१३ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/बीआरटीएस/५५६/२०१३,दि.२/८/२०१३

विषय - औंध रावेत रस्त्यावर “Y” Junction येथे अंडरपास बांधणे

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३६ विषय क्रमांक : १०

दिनांक : २/०८/२०१३

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.साधना जाधव

संदर्भ : मा.किरण मोटे , मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -.

सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पा.क्र. ७०० अ.नु.१३ ( जलक्षेत्र क्र. १० मध्ये उर्वरित ठिकाणी पाणी पुरवठयासाठी डि.आय.पाईप लाईन टाकणे ) या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ४०,००,०००/- वरुन ५०,००,०००/- करणेस तसेच सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पा.क्र. ७०० अ.नु.१५ ( जलक्षेत्र क्र. ११ मध्ये उर्वरित ठिकाणी पाणी पुरवठयासाठी डि.आय.पाईप लाईन टाकणे ) या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ३०,००,०००/- वरुन ५०,००,०००/- करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ७२० /२०१३
दिनांक - ०२/०८/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.